REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2019

महिला सबलीकरणासाठी भारतात असलेल्या कायदेशिर तरतुदी

श्री. शरद पंडित पाटील
सहाय्यक प्राध्यापक , सामाजिकशास्त्रे प्रशाळा
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ, जळगाव.

सार :–

भारतीय संविधानात असलेल्या महिला अधीकार आणि सुरक्षा विषयक तरतुदी यांना महिला सबलीकरणासाठी भारतीय संविधानात असलेल्या कायदेशीर तरतुदी असे म्हटले जाऊ शकते. भारतीय संविधानानुसार लैंगिक आधारावर कुठल्याही व्यक्तींशी भेदभाव करता येणार नाही अशी तरतुद आहे. यामुळे महिलांना अन्यायकारक सामाजिक, धार्मिक बंधने झुगारून स्वतंत्र आणि स्वावलंबी होता आले आहे. सतीप्रथा, देवदासी प्रथा, बालविवाह, हुंडा अशा अनिष्ट आणि महिलांच्या सुरक्षा आणि सन्मानाला मारक असलेल्या प्रथा नष्ट करण्यासाठी महिलांना कायदेशीर तरतुदींचा पाठींबा मिळाला आहे. परंतु या कायदेशीर तरतुदींची जाण सर्व स्तरावरील महिलांना असणे आवश्यक आहे.

प्रस्तुत संशोधनपर शोधनिबंधात महिलांची सुरक्षा, आत्मसन्मान आणि समानता यांचा पुरस्कार करणाऱ्या काही कायदेशीर तरतुदींची चर्चा केली आहे.

कळ शब्द– महिला सबलीकरण, महिला अधिकार, कायदेशीर तरतुदी.

प्रस्तावना :–

"Human Rights are women's rights and women's right are human rights, once and for all" - Hillary Clinton.महिला अधिकारांची हि हिलरी क्लिंटनयांची व्याख्या अतिशय समर्पक वाटते. त्यांच्या ह्या वाक्यातून महिला अधिकाराच्या बाबतीत समाजाने अजून पुरूषांच्या बरोबरीने किमान दर्जाही गाठता आला नाही ही खंत व्यक्त होते.

भारतीय राज्यघटनेने शोषित आणि वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी काही तरतुदी केल्या आहेत. भारतीय समाजात सर्वात तळागळातील कोणता घटक असेल तर तो म्हणजे महिलावर्ग. महिलांना स्वतंत्र व्यक्ती म्हणून जीवन जगताना स्वतःचा विकास साधावासा वाटतो परंतु हे तेव्हाच शक्य होईल जेव्हा त्यांना त्यांच्या अंतर्निहित असलेल्या क्षमतेला प्रकट करण्याची संधी मिळेल. संधीच्या अभावाने व्यक्तिमत्त्व विकासाला बाधा पोचते. मनुष्याला स्वातंत्र हवे असते, आणि स्वांतत्र हे अधिकारात निहित असते व अधिकार घटनादत्त वा कायदेशीर असतात. जगात मानवी अधिकारांचे सर्वाधिक उल्लघंन स्त्रियांच्या बाबतीत घडून आलेले दिसून येते.भारतीय समाजात हुंडाबळी, लैंगिक शोषण, लैंगिक आधारावर होणारा भेदभाव, छळ, बलात्कार, चेटकीण ठरवून ठार मारणे, देवदासी प्रथा इत्यादी गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांचे प्रमाण मोठे आहे. संविधानाने महिलांना जरी मूलभूत अधिकार आणि कायद्याचे संरक्षण दिलेले असले तरी किती महिलांपर्यंत याचा लाभ पोहचतो हा चिंतेचा विषय आहे. महिलांमध्ये अजूनही एक मोठा वर्ग आहे ज्याला स्वतःच्या अधिकारांबाबत अजूनही पुरेशी जागरूकता नाही.

विषयाचे महत्त्व :–

महिलांच्या अधिकाराचा प्रश्न हा अर्ध्या लोकसंख्येचा प्रश्न आहे. सदर विषयाचा अभ्यास करताना या विषयाची गंभीरता लक्षात येते. स्त्रियांमध्ये शिक्षणाचा पुरेसा प्रसार न झाल्याने महिला अधिकारांच्या बाबतीत जागरूकता आढळून येत नाही. तरी महिला अधिकारांबाबत समाजात जागृती घडवून आणण्यासाठी सदर अध्ययन उपयुक्त ठरते.

पुरूषप्रधान संस्कृतीमुळे महिलांच्या बाबतीत काही सामाजिक नियम महिला अधिकारांचा भंग करतात. महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी महिलांची प्रतिष्ठा आणि अधिकार अबाधित ठेवणारे संवैधानिक

आणि कायदेशीर अधिकार यांची प्रस्तुत विषयात चर्चा केल्याने जनजागृती होण्यास मदत होईल असे संशोधकाला वाटते.

विविध अहवालानुसार असे दिसून येते की, अलीकडील काळात महिलांच्या विरोधात होणारे गुन्हे वाढले आहेत. या गुन्ह्यांनाप्रतिबंध करण्यासाठी काही नवीन कायदे केले गेले आहेत जसे आतापर्यंत भारतातील मध्यप्रदेश, राजस्थान, हरियाणा व अरूणाचल प्रदेश या चार राज्यात अल्पवयीन मुलींवरील बलात्काराच्यागुन्ह्याला मृत्युदंडाच्या शिक्षेची तरतुद करण्यात आली आहे. पंरतु त्याची अंमलबजावणी तेवढी होताना दिसून येत नाही.

शोधनिबंधाची उद्दिष्टये :–

1. महिला सबलीकरणासाठी भारतात असलेल्या कायदेशीर तरतुदींचा आढावा घेणे.
2. महिला अधिकारांबाबत समाजात व महिलांमध्ये जागरूकता आणणे.
3. महिलांच्या सुरक्षेसंबधी प्रश्नांकडे समाजाचे लक्ष वेधणे.

संशोधन पद्धती :–

सदर संशोधनासाठी पुर्णतः दूय्यम स्त्रोतांचा उपयोग करण्यात आला असून विविध संदर्भग्रंथ, पुस्तके, इंटरनेट, वृत्तपत्रे, वृत्तवाहीन्यांद्वारे माहीती मिळविली आहे.

राष्ट्रीय महिला आयोग :–

1992 साली स्थापन झालेले 'राष्ट्रीय महिला आयोग' हे राष्ट्रीय महिला आयोग कायदा 1990 नुसार स्थपित झाले आहे. 90 च्या दशकात उदारीकरणामुळे भारतातील महिला चळवळीचा आंतरराष्ट्रीय महिला चळवळीशी संपर्क आला व त्यामुळे हक्क, समता, स्वातंत्र व प्रतिष्ठा किंवा आंतरराष्ट्रीय करारांनुसार मान्य असलेले मानवी हक्क देशातील महिलांना मिळत आहेत अथवा नाही यावर देखरेख ठेवण्यासाठी राष्ट्रीयमहिला आयोगाची निर्मिती झाली. राष्ट्रीय महिला आयोगाने धर्म, राजकारण, महिलांना राजकारणात आणि नोकऱ्यांमध्ये पुरेसे प्रतिनिधित्व, हुंडा प्रतिबंध, कामाच्या ठिकाणी महिलांचे शोषण अशा विषयांचा समावेश आपल्या कार्यात केला आहे. महिला आयोग 'राष्ट्र महिला' नावाचे मासिक दर महिन्याला हिंदी आणि इंग्रजी भाषेत प्रसारीत करते.

राष्ट्रीय महिला आयोग अनेक स्तुत्य उपक्रम राबविते जसे –

1. लैंगिक समानतेसाठी कार्य करणे.
2. भारतीय नागरीकांमध्ये स्त्रीभृणहत्या होऊ नये यासाठी जागृती घडवून आणणे.
3. भारत सरकारला कायदेशीर आणि संवैधानिक पातळीवर महिलांसाठी केलेल्या कायद्यांवर मत नोंदवीणे.
3
4. महिलांच्या समस्यांसंबंधी भारत सरकारला उपाययोजना सुचविणे.
5. महिलाना त्यांच्या अधिकारांसंबंधी जागृत करण्यासाठी योजना बनविणे आणि धोरण राबविणे.
6. पिडीत महिलांना कायदेविषयक सल्ला आणि साहाय्य पुरविणे.

कौटुबिक हिंसाचार महिला सुरक्षा कायदा, 2005 :–

कौटुबिक हिंसाचार महिला सुरक्षा कायदा, 2005 हा 26 ओक्टोबर 2006 रोजी लागू झाला. महिला अत्याचारविषयक अनेक कायदे निर्माण झालेले आसले तरी घराच्या चार भिंती आड होणारा हिंसाचार हा कायदा लागू होईपर्यंत उपेक्षिलाच होता. या कायद्यांतर्गत प्रकरण 2 अनुच्छेद (3) नुसार भारतात कौटुंबिक हिंसाचाराची व्यापक व्याख्या करण्यात आली आहे. फक्त शारिरीक नव्हे तर मानसिक, शाब्दिक, लैंगिक, आर्थिक, अत्याचाराला घरघुती हिंसाचार कायद्यांतर्गत सामाविष्ट केले गेले. शिवाय बेकायदेशीररीत्या हुंड्याची मागणी करून पत्नीचा व तिच्या नातेवाईकांचा छळ याचाही कौंटुबिक हिंसाचार कायदा –2005 यात समावेश आहे.

ह्या कायद्याच्या अनुच्छेद (3) च्या अतंर्गत केलेली व्याख्या भारतीय दंड संविधान अनुच्छेद 498(अ) मध्ये केलेल्या तरतुदीपेक्षा वेगळी आणि अधिक व्यापक आहे. उदाहरणार्थ 498 (अ) या कलमात पिडीत महिलेचा अर्थ केवळ लग्न झालेली महिला एवढाच असतो तर कौटुंबिक हिंसाचार महिला सुरक्षा कायदा – 2005 मध्ये पिडीत महिलेचा अर्थ लग्न झालेली महिला शिवाय अशा सर्व महिला ज्या कौटुंबिक संबंधात राहत आहेत किंवा कुणावर अवलंबून राहत आहेत असा होतो.

याशिवाय पीडितांमध्ये स्त्री, पुरूष, लहान मुले, माता–पिता, कुटुंबात राहणारे इतर व्यक्ती यांचा समावेश करता येवू शकेल. सेवाभावी संस्था अनुच्छेद 12(5)अंतर्गत पिडीत स्त्रियांना मुक्तपणे मदत करू शकतात.

विवाह कायदा(सुधारणा) विधेयक 2010:–

या विधेयकाच्या अंतर्गत घटस्फोटाची प्रक्रिया आधिक सोपी करण्यात आली. हिंदू विवाह कायदा–1955 आणि विशेष विवाह कायदा–1954 मध्ये यासाठी काही तरतुदी करण्यात आल्या आहेत.

पुर्नप्रस्थापित न करता येण्याजोगे विवाहसंबंध असतील तर पती अथवा पत्नी यापैकी कुणीही न्यायालयात घटस्फोटासाठी याचिका दाखल करू शकतो. परंतु न्यायालय विवाह संबंध पुर्नप्रस्थापित करता येण्याजोगे नाहीत हे तेव्हाच मानेल जेव्हा न्यायालयाला खात्री होईल की पती–पत्नी सतत तीन वर्षापासून विभक्त राहत आहेत. घटस्फोटाची याचिका न्यायालयात दाखल केल्यानंतर परस्पर संमतीने सहा महिन्यांच्या आता मागे न घेतली गेल्यास पूर्ण तपासणी करून न्यायालय घटस्फोट मंजूर करू शकेल.

- **आर्थिकदृष्ट्या दुर्बल असल्याच्या कारणावरून महिलेस घटस्फोट नाकारण्याचा अधिकार :–**

जर घटस्फोटामुळे महिलेस तीव्र आर्थिक संकटांचा सामना करावा लागेल अशी परिस्थिती असल्यास महिला 13(ड) नुसार घटस्फोट मान्य होउ नये असा दावा करू शकते. वरील कारणास्तव घटस्फोट याचिका रद्दकेली जाऊ शकते अथवा महिलेची आर्थिक विवंचना दूर होईपर्यंत घटस्फोटाची कार्यवाही थांबविली जाऊ शकते.

- **घटस्फोटामुळे पाल्यांवर दुष्परिणाम होत असल्यास :–**

वैवाहिक संबंध पुर्नप्रस्थापित करता येण्याजोगे नसल्यावर देखील न्यायालय घटस्फोटाचा निर्णय देणार नाही अगर त्या विवाहामुळे जन्माला आलेल्या मुलांच्या देखभालीसाठी पुरेशी आर्थिक तरतूद केलेली नसेल तर अनुच्छेद 13(इ) नूसार न्यायालयातर्फे घटस्फोट अमान्य केला जाउ शकतो.

शारीरिक आणि मानसिक छळ (अनुच्छेद 498 - A I.P.C) :–

अनुच्छेद **498 - A**अंतर्गत महिलेचा पती अथवा पतीचा नातेवाईक यांनी महिलेस क्रूरपणे वागविल्यास दंडाची तरतूद करण्यात आली आहे. या कायद्यांतर्गत 'क्रुर' शब्दाचा अर्थ खालीलप्रमाणे :–

(अ) असे कृत्य जे महिलेला आत्महत्या करण्यास प्रवृत्त करेल अथवा तिला गंभीर इजा पोहोचवेल (शारीरिक अथवा मानसिक).

(ब) महिलेस अथवा तिच्या नात्यातील व्यक्तीला मालमत्तेची मागणी करणे.

बालविवाह प्रतिबंध अधिनियम, 2006 :–

बालविवाह प्रतिबंध अधिनियमात 'बालक' या शब्दचा अर्थ पुरूष असेल तर वयाची एकवीस वर्ष पूर्ण न झालेली अथवा स्त्री असल्यास वयाची अठरा वर्ष पुर्ण न झालेली व्यक्ती, असा आहे. अशा प्रकारचा विवाह अस्तित्वात आल्यास जिल्हा न्यायालयात विवाह निरर्थक ठरल्यचा वटहुकूम काढतांना न्यायालय पुरूष विवाहपक्षाला आणि असा विवाहपक्ष सज्ञान नसल्यास त्याच्या माता पिता अथवा पालक यांना स्त्री विवाहपक्षाला तिच्या पुनर्विवाहापर्यत निर्वाह खर्च देण्याचा, अंतरिम किंवा अंतिम आदेश देऊशकेल.

अठरा वर्षावरील जो कोणी पुरूष बालविवाह करील, त्याला दोन वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा अथवा एक लाख रूपयांपर्यंत दंड अथवा दोन्हीही शिक्षा दिल्या जाऊ शकतात.

मातृत्व लाभ (सुधारणा) कायदा, 2016 :–

मातृत्व लाभ सुधारणा कायदा, 2016 हा काम करणाऱ्या महिलांसाठी असून हा कायदा पारित होण्याअगोदर महिलांना 12 आठवडे इतकी प्रसूती रजा मिळत असे परंतु आता ह्या कायद्यानुसार महिलांना मिळणाऱ्या रजेत वाढ करण्यात आली आहे. ह्या कायद्यातील प्रमुख तरतुदी पुढीलप्रमाणे –

1. महिलांना मिळणारी प्रसूती रजा 12 आठवड्यांवरून 26 आठवडे इतकी करण्यात आली आहे.
2. 26 आठवड्यांची प्रसूती रजा फक्त पहिल्या दोन मुलांसाठीच असेल. यानंतरची प्रसूती रजा 12 आठवड्यांचीच असेल.
3. 50 पेक्षा अधिक कामगार असलेल्या प्रत्येक आस्थापनेत काम करणाऱ्या मातेस पाळणाघराची व्यवस्था उपलब्ध करवून देणे आणि अशा मातेस कामादरम्यान दर चार तासांनी बाळाला पहायला जाण्याची आणि बाळाला दूध पाजण्यासाठी पाळणाघरी जाण्यास परवानगी दिली जावी.
4. तीन महिन्यांचे मूल दत्तक घेतल्यास मातेस तसेच जन्म देणाऱ्या मातेस (Commissioning Mother) 12 आठवड्यांची प्रसूती रजा उपलब्ध असेल.
5. प्रत्येक अस्थापनेला महिला कर्मचारी नियुक्तीच्या वेळेस वरील सुविधा उपलब्ध करवून देणे बंधनकारक असेल.

6

निष्कर्ष आणि उपायः–

1. महिला सबलीकरणासाठी आणि महिलांच्या उन्नतीसाठी भारतात विविध प्रकारच्या कायदेशीर तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. या कायदेशीर तरतुदींच्या आधारे महिलांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त करून देणे आणि महिलांवरील अन्याय, अत्याचाराला आळा घालण्याचे प्रयत्न केले जात आहेत, परंतु महिलांसाठी असलेल्या कायद्यांबाबत अजूनही महिलांमधील एक मोठा वर्ग अनभिज्ञ आहे. महिला अधिकारांबाबत महिलांमध्ये पुरेसा प्रचार केला गेला पाहिजे.

2. महिलांची सुरक्षा निश्चित करण्यासाठी कायदे तयार करताना शारीरिक तसेच मानसिक पातळीवर विचार करण्यात आला आहे. 'छळ' या शब्दाची विस्तृत व्याख्या करण्यात आल्याने स्त्रियांना संरक्षण लाभले आहे. तरीही कुटुंबात छळ होत असल्यास फार कमी महिला तक्रार करतात. यास्तव पिडीत महिलांना सामाजिक संघटनांतर्फे भावनिक आधार तसेच कायदेशिर सल्ला दिला गेला पाहिजे.
3. महिलांसाठी असणाऱ्या कायद्यांमध्ये कालानूरूप सुधारणा केल्या गेल्या आहेत, यावरून महिलांच्या आधिकाराबाबत समाज आणि सरकार संवेदनशिल असल्याचे दिसून येते. परंतू आजही महिलांच्या अनेक मागण्या मान्य होण्याच्या प्रतिक्षेत आहेत, जसे राज्यांच्या विधानसभा आणि संसद येथे महिलांना 33% आरक्षण.

समारोप :–

देश स्वतंत्र झाल्यानंतर कार्यान्वीत झालेल्या संविधानाने समानतेचा पुरस्कार केला. स्त्री–पुरूष यांच्यात लैंगिक आधारावर भेदभाव होणार नाही अशी तरतूद करण्यात आली. महिला सबलीकरणासाठी तसेच महिलांच्या सामाजिक स्थितीत सुधारणा करण्यासाठी प्रयत्न करण्यात आला आहे. महिलांची सुरक्षितता आणि सन्मान जपला जावा यास्तव कायदेनिर्मिती करणे व त्यात कालानुरूप बदल करण्याचे कार्य संसदेने केले आहे. भारतीय संविधानात महिला सुरक्षा आणि महिला सबलिकरण यासाठी करण्यात आलेल्या कायद्यांनी समाजाचा महिलांप्रती असलेला दृष्टिकोण बदलण्यास मदत केली आहे.

संदर्भ ग्रंथ :–

1.Thakur, A. 2018 "Women Empowerment :How Laws Let Down Women". Times of India, January 25, 2019
2. Pillai, J.k. 2011. "Women and Empowerment". Gyan Publishing House.
3. महाराष्ट्र शासनाचे महिला व बालविकास विभागाचे संकेतस्थळ.
(www.womenchildmaharashtra.gov.in)
4. Bakshi, P.2018. "The Constitution of India" edition 15.Universal Law Publishing – an imprint of LexisNexis.
5. कायदा आणि न्याय मंत्रालयाचे संकेतस्थळ.
(www.doj.gov.in)
6. मुंबई आणि गोवा उच्च न्यायालयाचे संकेतस्थळ.
(www.bombayhighcourt.nic.in)
7. तेलंगाना टुडे – दीपिका रेड्डी – 3 एप्रिल 2017
8. भारतात महिलांचे सबलीकरण – आशिया फाउंडेशन.
(www.asiafoundation .org)
9. राष्ट्रिय महिला आयोगाचे संकेतस्थळ.
(www.ncw.nic.in)
10. केंद्रीय महिला व बालविकास मंत्रालयाचे संकेतस्थळ.
(www.wcd.nic.in)
11. BBC.2013."Empowering Women In Rural India"January 15, 2019
12. Agnes, F.2001. "Law and Gender Inequality" Oxford University Press.
13.पवन शर्मा–"जर्नी ऑफ विमेन लॉ रिफॉर्मस ॲंड द लॉ कमीशन ऑफ इंडिया – सम इनसाईड"ISBN-13978– 8131252512
14.हरशरन सिंग."विमेन सेक्युरीटी ॲंड इंडियन लॉ"–ISBN-13978- 8193095799
15.विपुल, श्रि."राईट्स ऑफ इंडियन विमेन"– ISBN-13 978- 9384345044.
16. Yunus, S. , Varma, S. 2015. "Legal Provisions for Women Empowerment in India" International Journal of Human Management Sciences (JHMS), Volume -3, Issue 5 (2015) ISSN 2320-4044 (Online)
Page No.–366,370.
17. March 8, 2016 "11 Exclusive Rights for Women every Indian needs to Know".India Today.January 31, 2019

श्री. शरद पंडित पाटील
सहाय्यक प्राध्यापक , सामाजिकशास्त्रे प्रशाळा कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ, जळगाव.